# <u>सार्वजनिक आरोग्य विभाग</u>

इन्पलुएंझा ए (एच १ एन १) नियंत्रण कक्ष
दि. १३.७.२००९

दिनांक ६ **जुलै २००९** अखेर इन्पलुएंझा ए (एच १ एन १) ची साथ जगामध्ये १३५ देशात पसरली आहे. आतापर्यंत या रोगाचे ९४,५१२ रुग्ण आढळले असून त्यापैकी ४२९ मृत्यूमुखी पडले आहेत.

राज्यात दिनांक १२ **जुलै २००९** रोजी मुंबई, पूणे व नागपूर येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ तसेच जवाहरलाल नेहरु व मुंबई बंदर येथे ११,२३९ प्रवाशांची तपासणी करण्यात आली. तर प्रगतीपर एकूण ७,८७,०४८ प्रवाशांची तपासणी आजवर करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्रात इन्पलुएंझा ए (एच १ एन १) चे आतापर्यंत एकूण **२३ रुग्ण** आढळले आहेत. त्यापैकी मुंबईचे ११ रुग्ण, ठाण्याचे २ रुग्ण, पुण्याचे ९ रुग्ण, व नाशिक येथे १ रुग्ण आढळला आहे.अमेरिकेन सरकारच्या युवा देवाण-घेवाण कार्यक्रमाअंतर्गत अमेरिकेला गेलेले पुण्यातील २ व नाशिक येथील १ विद्यार्थी आणि पुण्यातील एका विद्यार्थ्याचे ४ सहवासित यांना या रोगाची लागण झाल्याचे सिध्द झाले आहे. हे ४ सहवासित रुग्ण म्हणजे इन्पलुएंझा ए (एच १ एन १) चे मनुष्यापासून मनुष्यास होणाऱ्या संसर्गाचे राज्यातील प्रथम उदाहरण आहे.

या साऱ्या रुग्णांच्या सहवासितांचा शोध, त्यांच्यावर प्रतिबंधात्मक उपचार आणि त्यांचे घरगुती पातळीवरील विलगीकरण तातडीने सुरु करण्यात आले आहे.

दिनांक १२ जुलै २००९ अखेर भारतामध्ये एकूण १९३ रुग्ण आढळले आहेत.

दिनांक १२ जुलै २००९ अखेर महाराष्ट्रामध्ये एकूण १२२ संशयित रुग्ण आढळून आले. त्यापैकी २३ पॉझिटिव आढळले असून त्यातील १४ रुग्णाना उपचारानंतर घरी पाठविण्यात आले आहे.

नोडल अधिकारी, इन्फूएंझा ए नियंत्रण
तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई.

प्रत माहितीसाठी सविनय सादर -
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (आरोग्य) यांच्या स्वीयसहाय्यक
सचिव (वैद्यकीय शिक्षण) यांचे स्वीयसहाय्यक
सचांलक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
उपसचिव सार्वजनिक आरोग्य, मंत्रालय, मुंबई.

http://maha-arogya.gov.in